SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३

अधिसूचना

क्रमांक : २०४/२०२३ दिनांक : ०७-१२-२०२३

विषय : एम.ए. योगशास्त्राच्या द्वितीय वर्षातील सत्र-३ ला थेट प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना सत्र १ व २ चे श्रेयांक मिळणे तसेच एसजीपीए/सीजीपीए निर्धारित करण्याबाबत.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता अधिसुचित करण्यात येते की, P.G. Diploma in Yoga Therapy या अभ्यासक्रमामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना M.A. Yogashastra Sem-III (CBCS) ला प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना CBCS नुसार प्रथम वर्षाचे क्रेडीट विचारात घेण्यासाठी खालील प्रमाणे पद्धती अवलंबीत आहे.

१. एम.ए. योगशास्त्राच्या द्वितीय वर्षातील सत्र III ला थेट प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना सत्र I व सत्र II चे श्रेयांक मिळण्याबाबत.

नॅशनल क्रेडीट फ्रेमवर्क २०२३ नुसार एक वर्षीय पदवीनंतर पदवीका किमान १२०० तास असावे. या योजनेनुसार पदव्युत्तर पदवीका योगाथेरपी (सत्र I व सत्र II) संशोधन पद्धतीमध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रम यांचे एकुण शिक्षणाचे तास १२०० तासांपेक्षा जास्त आहे. विद्यार्थी पदव्युत्तर पदवी कार्यक्रमाच्या सर्व पात्रता अटी पूर्ण करतात. त्यामुळे एम.ए. योगशास्त्राच्या द्वितीय वर्षातील सत्र III ला थेट प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना सत्र I व सत्र II चे ४४ क्रेडीट तसेच रिसर्च मेथडोलॉजीला ४ क्रेडीट असे एकुण ४८ क्रेडीट विद्यार्थ्यांना देण्यात यावे.

२. एम.ए. योगशास्त्राच्या द्वितीय वर्षातील सत्र III ला थेट प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे SGPA / CGPA निर्धारित करणे.

एम.ए. योगशास्त्राच्या द्वितीय वर्षातील सत्र III ला थेट प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे सत्र III व IV ला प्राप्त SGPA च्या आधारावर सम प्रमाणात सत्र I व सत्र II चा SGPA निर्धारित करून संपुर्ण सत्र I ते IV च्या CGPA ची गणना करावी.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ